नगरपरिषद / नगरपंचायत सेवा (सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण /शर्ती),विशेष आदेश २०२४ .

# महाराष्ट्र शासन
## नगरपरिषद प्रशासन संचालनालय

**आदेश क्रमांक-नपप्रसं-२०२४ / सर्व न.प./ प्र. क्र. / कक्ष -४/2725**

नवी मुंबई महानगरपालिका जुनी इमारत, ७ वा मजला, बेलापूर भवन ,
सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई- ४००६१४

दिनांक :- 20 MAR 2025

प्रस्तावना -

ज्या अर्थी, महाराष्ट्र नगरपरिषद,नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ७६ (२) नुसार "राज्य शासनाच्या सेवेतील चतुर्थ वर्ग पदांच्या समतुल्य पदांव्यतिरिक्त, अशा कोणत्याही अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या अर्हता, वेतन, भत्ते व इतर सेवाशर्ती, ह्या संचालकांकडून काढण्यात आलेल्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे निर्धारित करण्यात येतील" अशा प्रकारची तरतूद करण्यात आलेली आहे.आणि ज्या अर्थी, उक्त कलमानुसार "राज्य शासनाच्या सेवेतील चतुर्थ वर्ग पदांच्या समतुल्य पदांच्या बाबतीतील अर्हता, वेतन, भत्ते व इतर सेवाशर्ती तसेच सेवाप्रवेशाची पद्धती, याबाबतीत नगरपरिषदेकडून करण्यात आलेल्या उपविधींद्वारे निर्धारित करण्यात येतील" असेही स्पष्ट करण्यात आलेले आहे.त्या अर्थी, आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांना महाराष्ट्र नगरपरिषद नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ७६ खालील परंतुकान्वये प्राप्त अधिकाराचा वापर करून या आदेशाद्वारे सोबतच्या परिशिष्ट -१ मध्ये नमूद केलेल्या नगरपरिषद व नगरपंचायती आस्थापनेवरील गट- क मधील पदांसाठी त्या पदासमोर नमूद केलेल्या अर्हता निश्चित करत आहे. प्रत्येक नगरपरिषद व नगरपंचायती यांनी यापुढील भरती प्रक्रियेसाठी या अर्हता विचारात घ्याव्यात. ज्या नगरपरिषदेच्या अस्तित्वातील तरतुदी या आदेशातील तरतुदींच्या विसंगत असतील त्यांनी त्यांना त्यांच्याकडे अस्तित्वातील तरतुदीप्रमाणे प्रक्रिया राबवणे आवश्यक आहे असे वाटत असल्यास त्याची कारणे नमूद करून ते त्यांच्या नगरपरिषदसाठी कायम ठेवण्याकरता मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करावेत.आणखी असेही निर्देश देण्यात येतात की, सर्व नगरपरिषदा व नगरपंचायती यांनी आस्थापनेवरील गट- ड मधील नियुक्तींसाठी सोबतच्या परिशिष्ट-२ प्रमाणे अर्हता उपविधीद्वारे निश्चित करून त्यास सक्षम प्राधिकरणाची मान्यता घ्यावी. उपविधी मान्यतेसाठी खालील प्रमाणे कार्यवाही करावी.

१) ज्या नगरपरिषद किंवा नगरपंचायतीचे उपविधीमध्ये परिशिष्ट-२ व प्रमाणे तरतुदी आहेत त्यांना वेगळे उपविधी करण्याची आवश्यकता नाही.

२) ज्या नगरपरिषद किंवा नगरपंचायतीचे उपविधी मध्ये परिशिष्ट-२ च्या विसंगत तरतुदी आहेत त्यांनी विसंगती दूर करण्यासाठी उपविधी दुरुस्तीची कार्यवाही करावी.

३) ज्या नगरपरिषदा किंवा नगरपंचायतीच्या उपविधी तयार करण्यात आलेले नाहीत, त्यांनी नव्याने उपविधी तयार करून उपविधीमध्ये परिशिष्ट-२ मध्ये नमूद केलेल्या तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

सदरचे आदेश तात्काळ प्रसिद्धीच्या दिनांकापासून अमलात येतील,याची कृपया गांभीर्याने नोंद घ्यावी .

(मनोज रानडे, भा.प्र.से.)
आयुक्त तथा संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय,नवी मुंबई.

Scanned with CamScanner

प्रति,

१. मा. प्रधान सचिव (नवि-२), नगरविकास विभाग,मंत्रालय, मुंबई.

२. मा.विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, सर्व विभाग.

३. जिल्हाधिकारी (सर्व).

४. मुख्याधिकारी, नगरपरिषद /नगरपंचायत (सर्व).

५. निवड नस्ती .

Scanned with CamScanner

# नगरपरिषद,नगरपंचायत सेवा (सेवाप्रवेश व सेवा शर्ती),२०२४

## आदेश

क्रमांक- नपप्रसं-२०२४/सर्व न.प./ प्र. क्र.      / कक्ष -४ , महाराष्ट्र नगरपरिषद नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ७६ (१) नुसार नगरपरिषद व नगरपंचायतीच्या आस्थापनेवरील पदनिर्मितीचे अधिकार आणि कलम ७६ (२) नुसार "राज्य शासनाच्या सेवेतील चतुर्थश्रेणी पदांच्या समतुल्य पदांव्यतिरिक्त, अशा कोणत्याही अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या अर्हता, वेतन, भत्ते व इतर सेवाशर्ती, ह्या संचालकांकडून काढण्यात आलेल्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे निर्धारित करण्यात येतील" अशा प्रकारची तरतूद करण्यात आलेली आहे.

त्या अर्थी, महाराष्ट्र नगरपरिषद नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ७६ (२) नुसार आयुक्त तथा संचालक, नगपरिषद प्रशासन संचालनालय, यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारचा वापर करून या संदर्भात सद्या राज्यातील नगरपरिषद व नगरपंचायतीकरिता अस्तित्वात असलेले सर्व सेवाप्रवेश नियम, (संचालनालयाकडून मंजूर आकृतीबंधामधील सेवाशर्ती/अटी) आदेश व परिपत्रक, पत्र अधिक्रमित करून, याद्वारे, राज्यातील नगरपरिषद व नगरपंचायतीच्या विविध पदांच्या सेवाप्रवेशाचे विनियमन करणारे पुढील आदेश करीत आहे :-

**१. संक्षिप्त नाव, प्रारंभ :-**

(१) या नियमांना, नगरपरिषद,नगरपंचायत (नगरपरिषद गट-क व गट-ड संवर्गातील) (सेवाप्रवेश) नियम,२०२३ असे संबोधण्यात येईल.

(२) हे नियम, प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

(३) हे नियम, राज्यातील सर्व नगरपरिषद / नगरपंचायत आस्थापनेवरील सर्व मंजूर पदांवरील नियुक्त्यांना लागू होतील. परंतु यामध्ये महाराष्ट्र नगरपरिषद राज्यस्तरीय संवर्ग, रोजंदारीवर, हजेरीपटावर असलेले कामगार आणि कत्रांटी पध्दतीने, तसेच अंशकालीन व मानधन स्वरूपात नेमण्यात आलेल्या व्यक्तींचा समावेश होत नाही.

**२. व्याख्या:-**

या नियमात संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर,-

(१) "शासन " याचा अर्थ ,महाराष्ट्र शासन, असा आहे.

(२) "अधिनियम" याचा अर्थ,महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनिमय १९६५.

(३) "नगरपरिषद /नगरपंचायत"याचा अर्थ नगपरिषद प्रशासन संचालनालय या राज्यस्तरीय कार्यालयाच्या अधिपत्याखालील नगरपरिषद, नगरपंचायत म्हणजे महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनिमय,१९६५ च्या कलम खंड (६) अन्वये व्याख्या केलेली असा आहे.

(४) "संचालक" याचा अर्थ, नगरपालिका प्रशासन संचालक म्हणून राज्य शासनाने अधिनिमय १९६५ च्या तरतुदी अन्वये नेमणूक केलेला सक्षम प्राधिकारी असा आहे.

(५) "मुख्याधिकारी" याचा अर्थ, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनिमय १९६५ च्या तरतुदीनुसार शासनाने नियुक्ती केलेले अधिकारी.

Scanned with CamScanner

(६) "अध्यक्ष" म्हणजे अधिनियम १९६५ मधील कलम ५१ अन्वये नियुक्त केलेले नगरपालिकेचा अध्यक्ष .

(७) "कर्मचारी" याचा अर्थ, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनिमय १९६५ चे तरतुदी अन्वये नेमणूक केलेले कर्मचारी. पंरतु यामध्ये महाराष्ट्र नगरपरिषद राज्यस्तरीय संवर्ग, रोजंदारीवर, हजेरीपटावर असलेले कामगार आणि कत्रांटी पध्दतीने, तसेच अंशकालीन व मानधन स्वरूपात नेमण्यात आलेल्या व्यक्तींचा समावेश होत नाही.

(८) "निवड समिती" याचा अर्थ, नगरपरिषद,नगरपंचायतीचे आस्थापनेवरील गट-क व गट-ड संवर्गातील सरळसेवा भरतीकरिता उमेदवारांच्या निवडीच्या प्रयोजनार्थ शासनाकडून /संचालनालयाकडून वेळोवेळी गठीत करण्यात आलेली समिती असा आहे.

(९) "नियुक्ती प्राधिकारी "याचा अर्थ, शासकीय सेवेतील गट- क व गट-ड या संवर्गातील पदावर उमेदवारास नियुक्ती देण्यास प्राधिकृत असलेले सक्षम प्राधिकारी असा आहे.

(१०) "ज्येष्ठता अधिन पात्रता"याचा अर्थ,सेवाज्येष्ठता यादीनुसार ज्येष्ठता व सामान्य प्रशासन विभागाने दिनांक ०१.०८.२०१९ च्या आदेशाद्वारे व त्यानंतर वेळोवेळी यासंदर्भात निर्गमित केलेल्या आदेशाद्वारे पदोन्नतीसाठी विहित केलेल्या अटी व शर्ती नुसारची पात्रता असा आहे .

(११) "कलम" म्हणजे महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नागरी अधिनिमय १९६५ चे कलम.

(१२) "परिशिष्ट " याचा अर्थ, या नियमांना जोडलेले परिशिष्ट असा आहे.

(१३) "जोडपत्र" म्हणजे , या नियमांना जोडलेले जोडपत्र .

(१४) "पदवी" याचा अर्थ, सांविधिक विद्यापीठाची कोणत्याही शाखेतील पदवी.

(१५) "माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा" याचा अर्थ ,महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून घेण्यात येत असलेली माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा असा आहे.

(१६) "उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा" म्हणजे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून घेण्यात येत असलेली उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा असा आहे.

(१७) "लेखी परीक्षा" म्हणजे, शासनाने निवड केलेली संस्था /कंपनी यांच्याकडून नामनिर्देशानाने नियुक्त होण्यासाठी विहित केलेल्या पदाकरिता अर्ज करणाऱ्या उमेदवारांच्या योग्यतेचे किंवा अन्यथा मूल्यमापन करण्याच्या प्रयोजनाकरिता घेतेलेली परीक्षा आणि त्या लेखी परीक्षेतील उमेदवारांच्या कामगिरीचा संबंध असेल, त्यांच्या गुणवत्तेचा क्रम लावण्याच्या उद्देशाने घेतलेली परीक्षा असा आहे.

(१८) "तांत्रिक अर्हता " याचा अर्थ, राज्य शासनाने विविध प्रकारच्या औद्योगिक व्यवसायाचे प्रशिक्षण घेऊन अर्हता धारण करणारा असा आहे.

(१९) "अर्हता प्राप्त कर्मचारी" म्हणजे आदेशातील परिशिष्ट-(१) आणि परिशिष्ट-(२) मध्ये विहित केलेली अर्हता धारण करणारे .

(२०) या आदेशामध्ये वापरलेले परंतू व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम,१९६५ (१९६५ चा ४०) या अधिनियमामध्ये अनुक्रमे जो अर्थ नेमून दिला असेल तोच अर्थ असेल.

Scanned with CamScanner

३. **नियुक्तीचा मार्ग:-**

राज्यातील नगरपरिषदा, नगरपंचायत आस्थापनेवरील विविध संवर्गातील (उदा- वरिष्ठ लिपिक, लिपिक टंकलेखक, लघुटंकलेखक, वाहन चालक, उद्यान पर्यवेक्षक, ग्रंथपाल, सहायक ग्रंथपाल, प्रमुख अग्निशमन विमोचक (लिडिंग फायरमन), ड्रायव्हर कम ऑपरेटर, गाळणी चालक/ प्रयोगशाळा सहायक, पंप आपरेटर/ जोडारी /वीजतंत्री, तारतंत्री /वायरमन, आरेखक ,रोखपाल, फायरमन, शिपाई , व्हालमन , हवालदार /नाईक, सफाई कामगार व ज्या पदांचा यात उल्लेख करण्यात आलेला नाही असे इतर सर्व ) गट-क व गट-ड या पदावरील नियुक्ती पुढील मार्गाने करण्यात येईल.

**(क) पदोन्नतीने नियुक्तीचा मार्ग :-**

परिशिष्ट -१ मध्ये नमूद केल्यानुसार गट-क व गट-ड हे पद धारण करणारे तसेच सदर पदावर तीन वर्षाहून कमी नसेल इतकी नियमित सेवा झालेल्या तसेच परिशिष्ट-१ मध्ये विहित शैक्षणिक अर्हता धारण करणा-या आणि विभागीय परीक्षा उत्तीर्ण असलेले किंवा त्यातून सूट मिळालेल्या व्यक्तीमधून शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले अधिसूचना, शासन निर्णय, शासन परीपत्रक, आदेश व सूचना विचारात घेवून सेवाज्येष्ठता अधिन पात्रता या निकषावर योग्य व्यक्तीस पदोन्नती देण्यात यावी.

**(ख) नामनिर्देशनाद्वारे नियुक्तीचा मार्ग:-**

परिशिष्ट -१ मध्ये नमूद केल्यानुसार नगरपरिषद आस्थापनेवरील गट-क या पदांकरिता जिल्हा निवड समितीद्वारे किंवा शासन वेळोवेळी निर्धारित करेल अशा समितीद्वारे घेण्यात येणाऱ्या स्पर्धात्मक परीक्षेच्या निकालाच्या आधारे शिफारस करण्यात आलेल्या पात्र उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करण्यात यावी. याकरिता -

१) **वयोमर्यादा-** किमान वयाची अट १८ वर्ष पूर्ण व कमाल वयोमर्यादा महाराष्ट्र शासनाचे प्रचलित नियम व त्या अनुषंगाने वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयात नमूद केल्यानुसार असेल. सामाजिक व अन्य आरक्षण लागू असणा-या प्रवर्गातील उमेदवारांना प्रचलित शासन निर्णयानुसार वयोमर्यादा शिथिलक्षम असेल.

२) **शैक्षणिक अर्हता-** परिशिष्ट-१ मध्ये विहित केलेली शैक्षणिक अर्हता नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती होणा-या व्यक्तींना लागू राहील.

३) **शारीरिक पात्रता -** ज्या पदांकरिता शारीरिक अर्हता आवश्यक आहे, अशा पदांकरिता परिशिष्ट-१ मध्ये विहित केलेली शारीरिक पात्रता नामनिर्देशनाद्वारे नियुक्त होणा-या व्यक्तींना लागू राहील.

४) **तांत्रिक अर्हता-** ज्या पदांकरिता तांत्रिक अर्हता आवश्यक आहे, अशा पदांकरिता परिशिष्ट-१ मध्ये विहित केलेली तांत्रिक अर्हता नामनिर्देशनाद्वारे नियुक्त होणा-या व्यक्तींना लागू राहील.

५) **अनुभवाची अर्हता-** संबधित पदासाठी जो अनुभव धारण करणे आवश्यक आहे. त्याबाबत परिशिष्ट-१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे आवश्यक आहे .

६) वरील पदांसाठी ज्येष्ठता सूची एकत्रित करताना एकत्रित ज्येष्ठता सूचीतील ज्येष्ठता क्रमांक हा सबंधित पदावरील नियुक्तीच्या दिनांकानुसार निर्धारित होईल. तसेच वरील पंदावरील दोन कर्मचा-यांचा नियुक्ती दिनांक एकच असल्यास वयाने ज्येष्ठ असलेल्या कर्मचा-यास ज्येष्ठता यादीत प्राधान्य देण्यात येईल.तथापि सामाईक परीक्षेद्वारे नियुक्त झालेल्या कर्मचा-यांच्या बाबतीत मुदतीत सेवेत्सेवत रुजू झालेल्या कर्मचा-यांचा ज्येष्ठताक्रम गुणानुक्रमे निश्चित होईल.

Scanned with CamScanner

ज्येष्ठता निश्चितीसाठी महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, २०२१ जसेच्या तसे लागू राहतील.

४. **पदोन्नती व नामनिर्देशनाद्वारे नियुक्तीचे प्रमाण:-**

गट-क व गट-ड पदांच्या एकूण मंजूर पद्संख्येसाठी, पदोन्नतीने व नामनिर्देशनाने नियुक्ती देण्याचे प्रमाण परिशिष्ट-१ मध्ये नमूद केल्यानुसार राहील.

परंतु असे की, पदोन्नतीद्वारे नियुक्ती देण्याकरिता योग्य उमेदवार उपलब्ध नसतील तर नियुक्ती प्राधिकरण्याच्या मंजुरीने, त्या विशिष्ट भरती वर्षासाठी पदोन्नतीने व नामनिर्देशन याद्वारे करावयाच्या नियुक्तीकरिता विहित करण्यात आलेले प्रमाण त्या भरती वर्षापुरते शिथिल करून सदर पदे नामनिर्देशनाद्वारे भरता येतील .

५. **नियुक्तीची पद्धत व अर्हता:-**

५.१ नगरपरिषदा व नगरपंचायती आस्थापनेवरील विविध पदांच्या नियुक्तीची कार्यपध्दती, सेवांमधील आणि त्या खालील वेतनश्रेणीतील नियुक्तीकरिता शिक्षण, अनुभव, इत्यादीसंबंधात उमेदवारांनी धारण करणे आवश्यक असलेली अर्हता आणि नियुक्तीच्या पध्दती परिशिष्ट-(१) मध्ये विनिर्दष्ट केल्याप्रमाणे असतील.

५.२ उमेदवार भारताचा नागरिक असावा आणि महाराष्ट्रात किमान १५ वर्ष अधिवास (Domicile) करीत असल्याबाबत त्याने सक्षम प्राधिकरणाचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्रात जन्म झालेला असल्याबाबत पुरावा म्हणून जन्म दाखला अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

६. **विभागीय परीक्षेची तरतूद:-**

नगरपालिका आस्थापनेवरील गट-क तील संवर्गासाठी खालील नमूद बाबींकरिता विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

(१) सदर विभागीय परीक्षा सबंधित कर्मचा-याला सबंधित पदावर स्थायी होण्यासाठी.

(२) सदर विभागीय परीक्षा सबंधित कर्मचा-याला सबंधित पदावरून नजीकच्या वरिष्ठ पदावर पदोन्नती देण्यासाठी.

७. **परिविक्षाधीन कालावधी:-**

परिशिष्ट-(१) व परिशिष्ट-(२) मधील नमूद पदांवर नामनिर्देशन / सरळसेवेने नियुक्ती होणा-या व्यक्तीचा परिविक्षाधीन कालावधी त्यांच्या नेमणूकीच्या मूळ दिनांकापासून दोन वर्षाचा असेल. परिविक्षाधीन कालावधीतील काम समाधानकारक नसल्यास अपवादात्मक बाब म्हणून किंवा तत्संबंधी कारणे नमूद करून परिविक्षाधीन कालावधी पुढील १ वर्षापर्यंतच वाढविता येईल. शासनाच्या धोरणानुसार लागू असलेल्या अटी-शर्तीनुसार परिविक्षाधीन कालावधी यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर आदेश निर्गमित करण्यात येतील. मात्र, वाढीव परिविक्षाधीन कालावधीत समाधानकारक काम नसल्यास किंवा परिविक्षाधीन कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण न केल्यास सदर कर्मचा-याची सेवा समाप्त होण्यायोग्य असतील .

८. **हिंदी व मराठी भाषा परीक्षेबाबतची तरतूद:-**

(क) परिशिष्ट-(१) मधील नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने नियुक्त होणा-या व्यक्तीने,पदोन्नतीपूर्वी हिंदी व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण केलेली असणे अथवा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली

Scanned with CamScanner

असल्याची बाब वगळता, पदोन्नतीने नियुक्त होणा-या व्यक्तीने, परीक्षासंदर्भात महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या नियमानुसार, हिंदी व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. सदर परीक्षा उत्तीर्ण झाल्याशिवाय पुढील वार्षिक वेतनवाढ अथवा पदोन्नतीने पधील पदावर पदोन्नतीने नियुक्त होण्यासाठी सदर व्यक्तीला पात्र समजण्यात येणार नाही.

(ख) परिशिष्ट-(१) व परिशिष्ट-(२) मधील नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशन / सरळसेवे द्वारे नियुक्त होणा-या व्यक्तीने, हिंदी व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण केलेली असणे अथवा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली असल्याची बाब वगळता, नामनिर्देशनाने नियुक्त होणा-या व्यक्तीने, परीक्षासंदर्भात महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या नियमानुसार, हिंदी व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. सदर परीक्षा उत्तीर्ण झाल्याशिवाय पुढील वार्षिक वेतनवाढ अथवा पदोन्नतीने वरिष्ठ पदावर पदोन्नतीने नियुक्त होण्यासाठी सदर व्यक्तीला पात्र समजण्यात येणार नाही.

## ९. संगणक अर्हता प्रमाणपत्राबाबत तरतूद:-

परिशिष्ट-(१) मधील पदावर नामनिर्देशनाने / सरळसेवेने /पदोन्नतीने नियुक्त होणा-या व्यक्तीने, नियुक्ती होण्यापूर्वी / पदोन्नतीपूर्वी शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या नियमानुसार, संगणक अर्हता प्रचालन प्रमाणपत्र धारण करणे किंवा संगणक अर्हता प्रचालन प्रमाणपत्र सादर करण्यापासून सूट मिळाली असणे आवश्यक राहील. सदर संगणक प्रचालन प्रमाणपत्र धारण केल्याशिवाय पुढील वार्षिक वेतनवाढीस अथवा पदोन्नतीस पात्र समजण्यात येणार नाही .

## १०. लहान कुटुंबाच्या प्रतीज्ञापत्राबाबतची तरतूद:-

परिशिष्ट-(१ व) परिशिष्ट-(२) मध्ये नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशन / सरळसेवेद्वारे नियुक्त होणा-या व्यक्तीने, महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाच्या प्रतीज्ञापान) नियम -२००५ मधील तरतुदी नुसार,अथवा शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या नियम, आदेश अथवा संलेखानुसार नियुक्तीच्या वेळी लहान कुटुंबाच्या घोषणापत्र सादर करणे आवश्यक राहील.

(१) लहान कुटुंबाच्या घोषणापत्र सादर करण्याच्या दिनांकास दोन पेक्षा अधिक अपत्य असणारी व्यक्ती शासकीय नियुक्तीसाठी अपात्र समजण्यात येईल.

(२) शासकीय सेवेत नियुक्ती मिळाल्यानंतर एखाद्या व्यक्तीस नियुक्तीच्या वेळेस अथवा त्यानंतर दोन पेक्षा जास्त अपत्ये असल्याचे सिद्ध झाल्यास शासन सेवेतील सदर पदावर कार्यरत राहण्यासाठी अपात्र ठरविण्यात येईल.

## ११. सेवेतील पदावर नियुक्तीसाठी अनर्हता:-

(अ) भारताचा नागरिक नसेल,किंवा

(आ) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती, व औद्योगिक नगरी अधिनियम,१९६५ च्या तरतुदीप्रमाणे अनर्ह ठरविण्यात आले असेल, किंवा

(क) नगरपरिषद सेवेतून किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या सेवेतून किंवा कोणत्याही सरकारी सेवेतून गैरवर्तणुकीबद्दल बडतर्फ करण्यात आले असेल, किंवा

(ख) ज्यामध्ये नैतिक अध : पतनाचा समावेश होईल , अशा अपराधा बद्दल तिला दोषी ठरविण्यात आले असेल, किंवा

(ग) जर त्याच्या एकापेक्षा अधिक पत्नी हयात असतील आणि स्त्री उमेदवारांच्या बाबतीत जर तिने ज्याची पत्नी हयात आहे अशा व्यक्तीशी विवाह केला असेल, किंवा

Scanned with CamScanner

(च) महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम, २००५ नुसार अनर्ह ठरत असेल, किंवा

(छ) मा.न्यायालयात ज्या गुन्ह्यासाठी कैदेची शिक्षा फर्मावता येते, अशा गुन्ह्यासाठी सहा महिन्याहून अधिक मुदतीची कैदेची शिक्षा झाली असेल व ती शिक्षा अपील वा पुनरिक्षणात रद्द झाली नसेल, अशी व्यक्ती, किंवा

(ज) नगरपरिषद सेवेत असताना सिध्दपराध होऊन सहा महिन्यांपेक्षा अधिक मुदतीची कैदीची शिक्षा झाली असेल व ती शिक्षा अपील व पुनः रिक्षणात रद्द झाली नसेल,

अशी व्यक्ती नगरपरिषद सेवेत नेमणूक देण्यास वा नेमणूक चालू ठेवण्यास अपात्र समजली जाईल.

१२. **नगरपरिषद सेवेतील पदांवर आरक्षण -:**

नगरपरिषद सेवेतील पदाना शासनाच्या प्रचलित धोरणानुसार आरक्षण लागू असेल.

१३. **शारिरीक पात्रता प्रमाणपत्र आणि चारित्र्य पडताळणी अहवाल-:**

परिशिष्ट-(१) व परिशिष्ट-(२) मधील पदावरील नामनिर्देशन /सरळसेवेने नियुक्त व्यक्तींना,

(अ) परिशिष्ट-३ मध्ये विहीत नमुन्यानुसार सक्षम प्राधिकारी यांचेकडून आरोग्यविषयक वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. आणि

(ब) उमेदवाराच्या पूर्वचारित्र्य पडताळणीबाबत (Verification of Antecedents) पोलीस विभागाचे / सक्षम प्राधिकाऱ्याकडून अहवाल सादर करणे आवश्यक आहे.

१४. हे नियम अस्तित्वात येण्यापूर्वी विहीत मार्गाने झालेल्या सरळसेवा नियुक्त्यांना शासनाने अन्यथा वेगळी लेखी कारणे नमुद करून निर्देश दिले असतील तर या नियमातील तरतुदीमुळे त्यास बाधा येणार नाही.

१५. नगरपरिषद आस्थापनेवरील मंजूर पदांसाठी शैक्षणिक अर्हता व भरतीची कार्यपद्धत परिशिष्ट -१ मध्ये विहित करण्यात आली आहे. हि शैक्षणिक अर्हता व भरतीची कार्यपद्धत नव्याने करण्यात येणाऱ्या सरळसेवेने /पदोन्नतीसाठी लागू राहील.

१६. **नगरपरिषद /नगरपंचायत सेवेत प्रवेश केल्यानंतर सेवाविषयक अन्य आदेश लागू राहील:-**

कोणत्याही शासकीय सेवकाची शासकीय सेवेत नियुक्ती झाल्यानंतर शासनाने वेळोवेळी जारी केलेले नियम /सूचना /शासन निर्णय / शासन आदेश यामधील अटी व शर्ती सबंधित शासकीय सेवकास ज्याप्रमाणे लागू होतात त्याचप्रमाणे परिशिष्ट -१ व परिशिष्ट-२ मधील कर्मचाऱ्यांना त्या लागू होतील.

( मनोज रानडे, भा.प्र.से. )
आयुक्त तथा संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई.

Scanned with CamScanner

**महाराष्ट्र नगरपरिषदा,नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम,१९६५ मधील तरतुदीनुसार राज्यातील नगरपरिषदा /नगरपंचायत आस्थापनेवरील गट-क च्या(महाराष्ट्र राज्यस्तरीय संवर्ग पदांव्यतिरिक्त ) संवर्गनिहाय पदांची विहित शैक्षणिक व इतर अर्हता**

परिशिष्ट-(१)

(नगरपरिषदा /नगरपंचायत आस्थापनेवरील (महाराष्ट्र राज्यस्तरीय संवर्ग पदांव्यतिरिक्त ) गट-क)

| अ.क्र. | **पदनाम व श्रेणी** | **नेमणूकीची पद्धत व प्रमाण (सरळसेवा /पदोन्नती)** | **नेमणूकीकारिता अर्हता व नेमणूकीची पद्धत** |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | वरीष्ठ लिपिक (गट-क) | पदोन्नती १०० % | • मान्यता प्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी. ( हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकास लिपिक टंकलेखक/ रोखपाल या पदावर कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना सदरची अट लागू राहणार नाही . मात्र, त्यांना उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (H.S.C.) उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.)<br>• राज्य शासनाची मराठी ३० श.प्र.मि.इंग्रजी ४० श.प्र.मि. वेगाची टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे .<br>• **शासनाच्या प्रचलित धोरणानुसार लिपिक टंकलेखक /रोखपाल पदावरील किमान ३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक.**<br>• विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक. |
| २. | लिपिक-टंकलेखक/रोखपाल (गट-क) | सरळसेवा ५०% | • मान्यता प्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी.<br>• राज्य शासनाची मराठी ३० श.प्र.मि.इंग्रजी ४० श.प्र.मि. वेगाची टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे .<br>• महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ ,मुंबई याचेकडील अधिकृत MS-CIT किंवा समकक्ष असलेली एक शासन मान्य परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.<br>• मराठी भाषेचे पूरेसे ज्ञान आवश्यक. |
| | | पदोन्नती ५०% | • नगरपरिषद / नगरपंचायत आस्थापनेवरील चतुर्थ श्रेणीतील किमान ३ वर्षाचा ( नियमित सेवा पूर्ण व सेवा ज्येष्ठतेनुसार ) अनुभव असणे आवश्यक आहे.<br>• उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (H.S.C.) उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. (हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकास चतुर्थ श्रेणी कर्मचारी म्हणून नगरपरिषद / नगर पंचायत आस्थापनेवर कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना सदरची अट लागू राहील. मात्र,**त्यानंतर नियुक्त होणा-या चतुर्थ श्रेणी कर्मचारी यांना पदोन्नतीसाठी मान्यता प्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी अशी अट लागू राहील.)** |

Scanned with CamScanner

| अ.क्र. | पदनाम व श्रेणी | नेमणूकीची पद्धत व प्रमाण (सरळसेवा /पदोन्नती) | नेमणूकीकारिता अर्हता व नेमणूकीची पद्धत |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | | • राज्य शासनाची मराठी ३० श.प्र.मि.इंग्रजी ४० श.प्र.मि. वेगाची टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे .<br>• महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ ,मुंबई याचेकडील अधिकृत MS-CIT किंवा समकक्ष असलेली एक शासन मान्य परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.<br>• विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक. |
| ३ . | लघुटंकलेखक (गट-क स्वीय सेवा ) | सरळसेवा १००% | • मान्यता प्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी.<br>• मराठी व इग्रंजी लघूटंकलेखनाचे ८० श.प्र.मि. वेगाची परीक्षा उत्तीर्ण.<br>• मराठी ३० श.प्र.मि.इंग्रजी ४० श.प्र.मि. वेगाची टंकलेखनाची अर्हता<br>• महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ ,मुंबई याचेकडील अधिकृत MS-CIT किंवा समकक्ष असलेली एक शासन मान्य परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.<br>• मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक आहे. |
| ४ . | वाहन चालक (गट-क ) (तांत्रिक सेवा ) | सरळसेवा १००% | • महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा ((S.S.C ) उत्तीर्ण<br>• हलके वाहन चालविण्याचा परवाना असणे आवश्यक .<br>• वाहन चालविण्याचा तीन वर्षाचा अनुभव असावा.<br>• मोटार वाहन दुरुस्तीचे देखभालीचे कामासंबंधीत प्रशिक्षणाचे शासन मान्य शैक्षणिक संस्थेचे प्रमाणपत्र धारण करणा-यास प्राधान्य .<br>• मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक आहे. |
| ५. | उद्यान पर्यवेक्षक (गट-क ) | सरळसेवा १००% | • मान्यता प्राप्त कृषी विद्यापीठाची बी.एस्सी.(हॉर्टिकल्चर्स) ॲग्रीकल्चर/ फॉरेस्ट्री पदवी / मान्यता प्राप्त विद्यापीठाची वनस्तपी शास्त्रीतील पदवी परीक्षा उत्तीर्ण.<br>• शासकीय/निमशासकीय /स्थानिक स्वराज्य संस्थेकडील समकक्ष पदावरील किमान ३ वर्षाचा अनुभव धरण करणा-या उमेदवारास प्राधान्य . |
| ६. | ग्रंथपाल (गट-क ) | पदोन्नती १००% | • नगरपरिषदेच्या आस्थापनेवरील सहायक ग्रंथपाल या पदावर किमान ३ वर्षाची नियमित सेवा पूर्ण झालेल्या कर्मचा-याची सेवा ज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल.<br>• मान्यताप्राप्त विद्यापीठाची ग्रंथालय शास्त्राची (B.Lib.) पदवी. |
| ७. | सहायक ग्रंथपाल (गट-क ) | सरळसेवा १००% | • मान्यताप्राप्त विद्यापीठाची ग्रंथालय शास्त्राची (B.Lib.) पदवी. (पदव्युत्तर पदवी (M.Lib)असल्यास प्राधान्य . |

Scanned with CamScanner

| अ.क्र. | पदनाम व श्रेणी | नेमणूकीची पद्धत व प्रमाण (सरळसेवा /पदोन्नती) | नेमणूकीकारिता अर्हता व नेमणूकीची पद्धत |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | | • मराठी भाषेचे पूरेसे ज्ञान आवश्यक . |
| ८. | गाळणी चालक/ प्रयोगशाळा सहायक (गट-क) (तांत्रिक सेवा) | सरळसेवा १००% | • शासन मान्य विद्यापीठाचा विज्ञान शाखेचा रसायनशास्त्र विषयातील पदवीधर असणे आवश्यक.<br>• प्रयोगशाळा सहायक या पदाकरिता मान्यता प्राप्त संस्थेचे डी.एम.एल.टी. पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>• मराठी भाषेचे पूरेसे ज्ञान आवश्यक<br>• महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ ,मुंबई याचेकडील अधिकृत MS-CIT किंवा समकक्ष असलेली एक शासन मान्य परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र. |
| ९. | जोडारी /वीजतंत्री (गट-क) (तांत्रिक सेवा) | सरळसेवा १००% | • महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा ((S.S.C) उत्तीर्ण<br>• शासन मान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा वीजतंत्री / नळ कारागीर या विषयाचा अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र .<br>• संबधित कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव आवश्यक . |
| १०. | पंप ऑपरेटर (गट-क) (तांत्रिक सेवा) | सरळसेवा १००% | • महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा ((S.S.C) उत्तीर्ण<br>• शासन मान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे पंप ऑपरेटर या विषयाचा अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र .<br>• अनुभव धारकास प्राधान्य |
| ११. | तारतंत्री (वायरमन) (गट-क) (तांत्रिक सेवा) | सरळसेवा १००% | • महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा ((S.S.C) उत्तीर्ण<br>• शासन मान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे तारतंत्री (वायरमन) या विषयाचा अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र .<br>• अनुभव धारकास प्राधान्य. |
| १२. | अनुरेखक (गट-क) | सरळसेवा १००% | • महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा ((H.S.C) उत्तीर्ण<br>• शासन मान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडील अनुरेखक किंवा तत्सम कोर्स उत्तीर्ण<br>• संबंधित कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य.<br>• मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |
| १३. | आरेखक (गट-क) (तांत्रिक सेवा) | सरळसेवा १००% | • महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा ((H.S.C) उत्तीर्ण<br>• शासनमान्य संस्थेकडील ॲटोकॅाड कोर्स पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र<br>• संबंधित कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य.<br>• मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |

Scanned with CamScanner

| अ.क्र. | पदनाम व श्रेणी | नेमणूकीची पद्धत व प्रमाण (सरळसेवा /पदोन्नती) | नेमणूकीकारिता अर्हता व नेमणूकीची पद्धत |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १४. | प्रमुख अग्निशमन विमोचक (लिडिंग फायरमन) (गट-क) | पदोन्नती १००% | • नगरपरिषदेच्या आस्थापनेवरील अग्निशमन विमोचक (फायरमन) या पदावर किमान ३ वर्षाची नियमित सेवा पूर्ण झालेल्या कर्मचा-याची सेवा ज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल.<br>• अग्निशमन विमोचक (फायरमन) चे प्रशिक्षण पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र . |
| १५. | वाहन चालक कम ऑपरेटर (यंत्र चालक) गट -क | सरळसेवा १००% | • अ) शैक्षणिक पात्रता<br>• महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा ((S.S.C) उत्तीर्ण.<br>• राष्ट्रीय /राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र , महाराष्ट्र शासन यांचा ६ महिने कालावधीचा अग्निशमन प्रशिक्षण पाठयक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र.<br>• वैध जड वाहन चालविण्याचा परवाना आवश्यक.<br>• जड वाहन चालक म्हणून किमान ३ वर्ष काम केल्याचा अनुभव आवश्यक .<br>• मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक आहे.<br>• ब. शारीरिक पात्रता<br>• उंची १६५ से.मी.(महिला उमेदवारांची उंची १५७ से.मी.)<br>• छाती साधारण ८१ से.मी. फुगवून ५ से.मी. जास्त (महिला उमेदवारांना लागू नाही.)<br>• वजन -५० कि.ग्र. (महिला उमेदवारांची ४६ कि.ग्र.)<br>• दृष्टी चांगली (विना चष्माचे दृष्टी ६/६ तसेच Ishanhara chart नुसार रंगदृष्टी चांगली)<br>• क )नामनिर्देशनाच्या उमेदवारांचे वय ३० वर्षापेक्षा जास्त असू नये. |
| १६. | वैद्यकिय अधिकारी | सरळसेवा १००% | • मान्यताप्राप्त विद्यापीठाची वैद्यकीय पदवी (एम.बी.बी.एस.)<br>• महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल अधिनियम अंतर्गत नोंदणी आवश्यक.<br>• शासकीय /निमशासकीय /स्थानिक स्वराज्य संस्था /खाजगी रुग्णालयातील संबंधित विषयातील कामकाजाचा किमान ३ वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>• मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. जनरल नर्सिग व |
| १७. | आरोग्य सहायक (गट-क) | सरळसेवा १००% | • महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा ((H.S.C) उत्तीर्ण<br>• शासनाच्या बहुउद्देशीय कर्मचा-यांसाठी विहित केलेला किमान १२ महिन्याचा प्रशिक्षण पाठ्यक्रम उत्तीर्ण /स्वच्छता निरीक्षक |

Scanned with CamScanner

| अ.क्र. | पदनाम व श्रेणी | नेमणूकीची पद्धत व प्रमाण (सरळसेवा /पदोन्नती) | नेमणूकीकारिता अर्हता व नेमणूकीची पद्धत |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | | अभ्यासक्रम उत्तीर्ण .<br>• संबंधित विषयाचा कामाचा किमान २ वर्ष अनुभव आवश्यक .<br>• मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक . |
| १८. | परिचारिका | सरळसेवा<br>१००% | • महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा ((H.S.C ) उत्तीर्ण<br>• महाराष्ट्र नर्सिग कौन्सिलची जनरल नर्सिग /मिडवाईफरी पदविका. अधिनियम अंतर्गत नोंदणी आवश्यक.<br>• महाराष्ट्र नर्सिग कौन्सिलची नोंदणी आवश्यक<br>• परिचारिका म्हणून शासकीय /निमशासकीय /स्थानिक स्वराज्य संस्था /खाजगी रुग्णालयातील संबंधित विषयातील कामकाजाचा किमान ३ वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>• मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |

(टीप-एकांकी पद असल्यास ते सरळसेवेद्वारे भरण्यात येईल.)

Scanned with CamScanner

# परिशिष्ट-(२)

## (नगरपरिषदा /नगरपंचायत आस्थापनेवरील गट -ड) आदर्श नमुना

| अ.क्र. | पदनाम व श्रेणी | नेमणूकीची पद्धत व प्रमाण (सरळसेवा /पदोन्नती) | नेमणूकीकारिता अर्हता व नेमणूकीची पद्धत |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४ |
| १. | शिपाई | सरळसेवा १००% | • महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (S.S.C) उत्तीर्ण<br>• मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक आहे. |
| २. | हवालदार /नाईक | पदोन्नती १००% | • नगरपालिकेमध्ये शिपाई या पदावर किमान ५ वर्षाची नियमित सेवा पूर्ण केलेल्या कर्मचा-याची सेवाजेष्ठाता व गुणवत्तेनुसार पदोन्नतीने नियुक्तीने करता येईल.<br>• मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक आहे. |
| ३ | व्हालमन | सरळसेवा १००% | • महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (S.S.C) उत्तीर्ण<br>• शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे नळ कारागीर या विषयाचा अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र.<br>• संबंधित कागाचा अनुभव असल्यास प्राधान्य.<br>• मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक आहे. |
| ४. | अग्निशामक विमोचक (फायरमन) गट-ड ,अग्निशमन सेवा) | सरळसेवा १००% | अ. शैक्षणिक अर्हता –<br>आ. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (S.S.C) उत्तीर्ण<br>इ. १.राष्ट्रीय /राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र शासन यांचा ६ महिने कालावधीचा अग्निशमन प्रशिक्षण पाठयक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र.<br>२. अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचा ६ महिने कालावधीचा अग्निशमन प्रशिक्षण पाठयक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र आवश्यक आहे<br>ई. मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक आहे.<br>उ. ब. शारीरिक पात्रता<br>ऊ. उंची १६५ से.मी.(महिला उमेदवारांची उंची १५७ से.मी.)<br>ऋ. छाती साधारण ८१ से.मी. फुगवून ५ से.मी. जास्त (महिला उमेदवारांना लागू नाही.)<br>ऌ. वजन -५० कि.ग्र. (महिला उमेदवारांची ४६ कि.ग्र.) |

Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ऍ. दृष्टी चांगली (विना चष्माचे दृष्टी ६/६ तसेच Ishanhara chart नुसार रंगदृष्टी चांगली )<br>क )नामनिर्देशनाच्या उमेदवारांचे वय ३० वर्षापेक्षा जास्त असू नये. |
| ५. | मुकादम | • पदोन्नती<br>• १००% | • नगरपालिकेच्या आस्थापनेवरील किमान सफाई कामगार सवर्गातून ५ वर्ष नियमित सेवा पूर्ण<br>• किमान सातवी उत्तीर्ण<br>• मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक आहे. |
| ६. | सफाई कामगार | • नामनिर्देशन /वारसा हक्काने | • सातवी उत्तीर्ण .<br>• मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक . |

Scanned with CamScanner

# परिशिष्ट - (३)

नगरपरिषद /नगरपंचायत सेवा (सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण/ शर्ती) नियम,२०२३ अतंर्गत सेवा भरतीसाठी अनुसरावायची कार्यपद्धती -

**१. अधिकारी / कर्मचारी निवड समिती:-**

महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औदोगिक नागरी अधिनियम, १९६५ मधील तरतुदीनुसार नगरपालिका आस्थापनेवरील परिशिष्ट- १ व परिशिष्ट- २ मधील पदावर नियुक्तीकरीता जिल्हा स्तरावर जिल्हा निवड समिती गठीत करण्यात येईल. सदर समिती गठीत करण्यात आलेल्या दिनांकापासून एक वर्ष कालावधीकरीता अथवा भरती प्रक्रिया पुर्ण होईपर्यंतच्या कालावधीकरीता (यातील जो कालावधी कमी असेल. त्या कालावधीकरीता वैध राहील.)

**२. नामनिर्देशन / सरळसेवेने पदे भरण्यासाठी जिल्हा निवड समितीची रचना खालीलप्रमाणे असेल:-**

| अ.क्र. | पदनाम | |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २ | मागासवर्गीय प्रवर्गातील अधिकारी | सदस्य |
| ३ | जिल्हा महिला व बालकल्याण अधिकारी | सदस्य |
| ४ | मुख्याधिकारी (संबंधित नगरपरिषद) | सदस्य |
| ५ | जिल्हा समाजकल्याण अधिकारी | सदस्य |
| ६ | जिल्हा आदिवासी विकास अधिकारी | सदस्य |
| ७ | जिल्हा सह आयुक्त (नपशा) | सदस्य सचिव व निमंत्रक |

**३. नामनिर्देशन / सरळसेवेव्दारे नेमणूकीकरीता कार्यपध्दती:-**

(३.१) नगरपालिकेमधील रिक्त पदे निश्चित करून सदर पदे भरण्यासंदर्भात जिल्हाधिकारी यांनी निर्देश दिल्यानंतर संबंधित पदे भरण्याची कार्यवाही जिल्हा निवड समितीमार्फत करण्यात येईल.

(३.२) **नगरपालिकेतील रिक्त पदे भरण्यासंदर्भात पुढील कार्यपध्दती अनुसरण्यात यावी:-**

(३.२.१) एखाद्या पदावरील नियुक्तीसाठी ऑनलाईन / वृत्तपत्रातील जाहिरातीला अनुसरून विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जाचा यादीतील उमेदवारांच्या नावाचाच विचार करण्यात येईल.

(३.२.२) उमेदवारांने अर्जात दिलेल्या तपशीलाबाबत माहिती मागविण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना असेल,

(३.२.३) जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे लेखी किंवा मौखिक परीक्षा घेण्यात येईल.

(३.२.४) निवड समिती एकूण गुण लक्षात घेऊन गुणांच्या उतरत्या क्रमाने उमेदवारांची यादी तयार करील व ती जिल्हाधिकारी यांच्याकडे गोपनीयरित्या बंद लिफाफ्यात सादर करील.

(३.२.५) भरती प्रक्रियेसाठी सामान्य प्रशासन विभागाने वेळोवेळी दिलेले निर्देश लागू राहतील.

Scanned with CamScanner

४. **पदोन्नतीने नेमणूकीकरीता कार्यपध्दती:-**

स्थायी निर्देश क्र. २४-२०२५ अन्वये पदोन्नती समितीची रचना खालीलप्रमाणे असेल:-

| अ.क्र. | पदनाम | |
|---|---|---|
| १ | जिल्हा सह आयुक्त नगर परिषद प्रशासन | समिती अध्यक्ष |
| २ | जिल्हा सह आयुक्त यांनी नियुक्त केलेला नगर परिषद संवर्गातील लेखाधिकारी | सदस्य |
| ३ | मुख्याधिकारी (संबंधित नगरपरिषद) | सदस्य सचिव |

५. पदोन्नतीसाठी कार्यपद्धती संचालनालयाचे दिनांक २८.४.२०२२ रोजीच्या परिपत्रकान्वये नुसार राहील.

(मनोज रानडे, भा.प्र.से.)
आयुक्त तथा संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

Scanned with CamScanner